## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. २६१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २०/०५/२०१८

**१) सोन्या–चांदीच्या दागीने व नगदी पैश्याची चोरी :–**

दिनांक १५/०५/२०१८ चे १८.०० ते १९/५/२०१८ चे ०९.१५ वाजता दरम्यान यातील अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घराचे समोरील व मागील दाराचा कडीकोंडा तोडुन आत प्रवेश करून घरातील आलमारीचे लॉक तोडुन त्यातील १ ग्रॅम सोन्याचे लॉकेट, ७.५० ग्रॅम सोयाची गाठी, मनघटया १२ मनी सोन्याचे ६ ग्रॅम, चांदीचे २ जोळ चाळ ६५ ग्रॅम, चांदीचे बिछवे १० ग्रॅम, सोन्याची फुली १ ग्रॅम , चांदीचा कळदोळा ३० ग्रॅम, चांदीची अंगठी २.५ ग्रॅम, चांदीचे २ छल्ले, कमरपट्टा ५० ग्रॅम, व नगदी २५,०००/रु. असा एकुण ५५,८००/रु. चा माल चोरून नेल्याने फिर्यादी सौ. सोनल धनराज लाडसे वय २१ वर्ष रा. शिवाजी नगर तुमसर हिचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ४५४,४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सरोदे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**२) रेल्वे लाईनच्या ईलेक्ट्रीक तांब्याची चोरी :–**

दिनांक १९/०५/२०१८ चे ००.३० वाजता दरम्यान यातील शेत शिवारातुन ऑर्डन्स फॅक्ट्री कडे जाणा–या रेल्वे लाईनचे ओएचई ईलेक्ट्रीक तांब्याची तार वजन ५० किलो कि. २०,०००/रु. ची कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेल्याने फिर्यादी सुभाशीष दिनेश दत्ता वय ५४ वर्ष रा. रेल्वे कॉलोनी रोड देव्हाडी यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गायधने पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**३) जनावरांना निदर्यतेने वागणुक देवुन वैदयकीय प्रमाण पत्र सोबत नबाळगता मिळुन आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १९/०५/२०१८ चे ००.३० वाजता दरम्यान यातील तिन्ही आरोपीतांनी संगनमत करून त्याचे ताब्यातील ट्रकमध्ये एकुण ३६ जनावरे कि. ७५,०००/रु चे ट्रकमध्ये डांबुन कोबुन त्याना निर्दयतेची वागणुक देवुन जनावरा करीता चारापाणी व वैदयकीय प्रमाणपत्र सोबत न बाळगता जनावरे कत्तलीकरीता अवैध वाहतुक करीत असतांनी मिळुन आल्याने, सरतर्फे फिर्यादी पोना. राठोड यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ११(१)(ड),(ई) प्रा.णी.वा.कायदा सहकलम ५(अ)प्रा.स.अधी. सहकलम ६६/९२ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ मुटकुरे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**४) बालकाला मारपीट करून कुत्र्याने चावा घेतल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १९/०५/२०१८ चे १३.३० यातील फिर्यादी बालक व आरोपी हे त्याचे मित्र सोबत खेळत असतांना यातील आरोपीने सोबत खेळत असलेल्या मुलांना मारपीट केल्या बाबत फिर्यादी हा आरोपीचे वडीलांना सागण्यास गेला असता, आरोपीने फिर्यादी बालक याला हाता बुक्याने मारपीट करून मान पकडुन ओडत बाहेर आनल्याने, फिर्यादीचे गळयाला पकडुन ओडत आनल्याने उजवे पायाला खरचटयाची जखम झाली व त्याच्या घरी पाळलेला कुत्रा खिवडल्याने डावे हाताचे पंज्याला चावा घेतला अशा फिर्यादी रोहण नरेश दुबडे वय २१४ वर्ष यांचे तोंडी व डॉ. एमएलसी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २८९,३२३ भादवी. सहकलम २३ बालन्याय संरक्षण अधी.२०१२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. कळपते पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

५) अल्वयीन मुलीला पळवुन नेल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक ०९/०५/२०१८ चे १९.३० ते २०.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी ही घरों कुनालाही न सांगता घरून निघुन गेली असुन तिला यातील संशयीत आरोपीने पळवुन नेले असल्याचे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३६३ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. नवखरे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

६) शेतातील धुरा पेटवुन धु–याची आग शेतापर्यत जावुन तनसीचे ढिग व म्हैशीचा तोंडाचा भाग जळुन नुकसान केल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक १९/०५/२०१८ चे ११.०० ते १३.०० यातील आरोपीने त्याचे शेतातील धुरा पेटविल्याने तिचे निष्काळजीनामुळे धु–याची आग फिर्यादीचे शेतापर्यंत जावुन फिर्यादीचे शेतातील २ तनसीचे ढिग व फिर्यादीचे शेतामध्ये बांधलेली नामदेव बळीराम खराबे रा. चांदोरी यांची १ म्हैशीचा समोरील तोंडाचा भाग जळुन अंदाजे २,०००/रु. चे नुकसान झाल्याने फिर्यादी दिंगाबर लाखडु सुर्यवंशी वय ६७ वर्ष रा. चांदोरी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २८५ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. नबखरे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

७) संगनमत करून महिलेचा विनयभंग करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक १८/०५/२०१८ चे ०९.०० वाजता यातील आरोपी फिर्यादी ही तिचे घरी छपरात पलगांवर बसली असतांना यातील आरोपी क्र. १ ने छपरात प्रवेश करून फिर्यादीचे विनयभंग केला व फिर्यादी ओरडली असता, आरोपी क्र. २ व ३ तेथे येवुन आमचे पोराची बदनामी करतेस असे बोलुन थापड बुक्यानी मारहान करून आरोपी क्र. १ ने जिवाने मारण्याची धमकी दिली व आरोपी क्र. ४ ने फिर्यादीला अजुन मारा असे म्हणुन आरोपी क्र. १,२,३ यांनी चिथावणी दिल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. एमएसली रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ४५२,३५४,(अ),(१)३५४(ब)३२३,५०६,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.नी. गुरनुले पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत.

८) महिलेचा विनयभंग करून जिवे मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक १९/०५/२०१८ चे १२.०० वाजता यातील फिर्यादी ही तिचे घरासमोर ऊभी असतांनी आरोपीने बांधकामाच्या जागेच्या वादावरून भांडण करून फिर्यादीस अश्लिल शब्दात शिवीगाळ करून तिचे केस ओढुन साडीचा पदर ओडतान केला व फिर्यादीचा पती सोडविण्यास धावले असता त्याची गच्ची पकडुन मर्डर करीन अधी धमकी देवुन त्याचे उजवे हाताचे अंगठयाला चावा घेवुन दुखापत केल्याने फिर्यादीचे लेखी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३५४,(ब),३२४,५०४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. आळे पोलीस स्टेशन आलखनी हे करीत आहेत

९) गळफास लावुन युवकाचा मृत्यु:–

दिनांक १९/०५/२०१८ चे ०९.३० ते १२.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादीचा मोठा भाऊ मृतक रोशन सेवकजी जांभुळकर वय २५ वर्ष रा. बोरगाव/राजेगाव हा वडीलांचे शेतीची कामे करून घराचा संपुर्ण कारभार त्याचे कडे होता त्याने वडीलाचे नावावर शेतीवर कर्ज उचलला होता व शेतात नापीकीमुळे टेंशन मध्ये राहत होता या कारणा वरून यातील मृतकने स्वत:चे शेतात आंब्याचे झाडाला स्वत: नॉयलान दोरीने गळफास लावुन आत्महत्या केली आहे त्याचे मरणास कोणताही संशय नाही असे फिर्यादी रूषभ सेवकजी जांभुळकर वय २२ वर्ष रा. बोरगाव/ राजेगाव यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. ऊईके पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**१०) दारू पिवुन दारूच्या नशेत वाहन चालवीतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक १९/०५/२०१८ चे १८.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन केसलवाडा फाटा येथे चालवीतांनी मिळुन आल्याने, त्याचे वैदयकीय परीक्षण अहवाला वरून सरतर्फे फिर्यादी पो.ना. तुमाने यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम १८५(१) मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास पोहवा. काटेखाये यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**११) अवैध हातभट्टी दारु अडड्यांवर धाडी . :—**

दिनांक १९/०५/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन तुमसर व गोबरवाही येथे अवैध देशी, हातभट्टी दारू अडड्यावर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १९५ लिटर हातभंट्टी दारू +३८० किलो सडवा+ साहित्य किंमती ३९,४५०/—रु. चा माल जप्त करण्यात आला.

**१२) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक १९/०५/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ९३ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी वाहतुक— ०१ तीन सिटर वाहनाकरीता— ०७ ईतर वाहनांवरती — ८५ केसेस करण्यात आले आहे.

(मपोउपनि.प्रणती लांजेवार)
माहिती कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.
**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.